## ५.पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| ०१ | अंमलबजावणी यंत्रणा | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प. |
| ०२ | कायदे / नियम / शासन निर्णय | १. आ.वि.वि., शासन निर्णय क्र. आवगृ-२०१६ /प्र.क्र.८७/का-१२, दि.१५.१०.२०१६.<br>२. आ.वि.वि., शासन निर्णय क्र. आवगृ-२०१६/प्र.क्र.८७/का-१२, दि. २७.१०.२०१८.<br>३. आ.वि.वि., शासन निर्णय क्र. आवगृ-२०१६/प्र.क्र.८७/का-१२, दि.१६ सप्टेंबर, २०१९. |
| ०३ | थोडक्यात कार्यपध्दती / अनुज्ञेय सेवा | शासकीय वसतिगृह प्रवेश क्षमता पूर्ण झाल्यानंतर इ १२.वी नंतरच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या तथापि विभागाच्या शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना भोजन, निवास व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून घेण्यासाठी अर्थसहाय्य केले जाते. तसेच सदर योजनेचा विस्तार तालुकास्तरापर्यंत करण्यात येऊन इ १० .वी नंतर केंद्रीय पध्दतीने प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या तंत्र शिक्षण तसेच व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांचा समावेश योजनेत करण्यात आलेला आहे.सदर योजनेत महानगर स्तरावर रु,५१००/-.विभागस्तरावर रु,६०००/-. ४३००/-. जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर रु ३८००/-. याप्रमाणे प्रतिमाह रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येते . |
| ०४ | पात्रता/निकष | १. विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा.<br>२. विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची वार्षिक कमाल उत्पन्न मर्यादा रु.२.५० लक्ष पर्यंत राहील.<br>३. विद्यार्थ्याने १२ वी नंतरच्या किमान २ वर्ष कालावधीच्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असावा. |
| ०५ | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना | • अर्ज नमुना https:// swayam. mahaonline. gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| ०६ | अर्जाची किंमत असल्यास किती | • सदर अर्ज विनामूल्य उपलब्ध आहे. |
| ०७ | जोडावयाची कागदपत्रे | जातीचा दाखला, जातीचे वैधता प्रमाणपत्र, वार्षिक उत्पन्न दाखला.मागील वर्षाची गुणपत्रिका इ , |